वाहतुक शाखा, पुणे शहर
पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ ६६६० /२०२३ दिनांक :- १६/०९ /२०२३

-: प्रसिध्दीपत्रक :-

गणपती प्रतिष्ठापना व मुर्ती खरेदीनिमित्त करण्यात आलेली वाहतूक व्यवस्था-

दिनांक १८/०९/२०२३ व १९/०९/२०२३ रोजी श्री. गणेशाची प्रतिष्ठापना निमित्त गणेश भक्त व मंडळे सकाळी ०६.०० ते २४.०० वा.पर्यत श्रींची मुर्ती खरेदी करीत असतात. चालू वर्षी गणेश मुर्ती विक्रीचे बहुसंख्य स्टॉल हे **डेंगळे पुल ते शिवाजी पुलाचे दरम्यान श्रमिक भवन समोर (आण्णाभाऊ साठे चौक) व कसबापेठ पोलीस चौकी ते जिजामाता चौक ते मंडई तसेच सावरकर पुतळा ते समाधान भेळ सेंटर (सिंहगड रोड) पर्यत** असलेने या परीसरातील नागरीकांची गैरसोय तसेच वाहतूकीची कोंडी टाळणेसाठी सदर ठिकाणी वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने इष्ट आहे,त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, विजयकुमार मगर, पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन आवश्यकते नुसार दिनांक **१७/०९/२०२३ ते १९/०९/२०२३ रोजी सकाळी ०६.०० ते रात्री २४.०० वा.** पर्यत वाहतुकीत खालीलप्रमाणे बदलाबाबतचे आदेश निर्गमित करित आहे.

अ) वाहतूक व्यवस्था :-

**१) शिवाजी रोड :-** गाडगीळ पुतळा चौक ते गोटीराम भैय्या चौक वाहतूकीसाठी बंद करण्यात येत आहे. वाहन चालकांनी खालील मार्गाचा अवलंब करावा.

**पर्यायी मार्ग :-** गाडगीळ पुतळा चौकातून डावीकडे वळण घेऊन

१. संताजी घोरपडे पथावरुन कुंभारवेस चौक, शाहीर अमर शेख चौक मार्गे इच्छितस्थळी जावे.
२. शिवाजीनगर कडून शिवाजी रोडने स्वारगेटकडे जाणाऱ्या वाहनचालकांनी स.गो.बर्वे चौकातून डावीकडे वळन न घेता, सरळ जंगजी महाराज रोडने खंडोजीबाबा चौक, टिळक चौक मार्गे टिळक रोडने जावे.
३. झाशी राणी चौक ते खुडे चौक ते डेंगळेपुल मार्गे कुंभारवेसकडे जाणा-या वाहन चालकांनी खुडे चौकामधून म.न.पा.पुणे समोरुन मंगला सिनेमा लेन मधुन कुंभारवेस **किंवा** प्रिमीयर गॅरेज चौक शिवाजीपुल मार्गे गाडगीळ पुतळा चौक डावीकडे वळन घेऊन कुंभारवेस चौक या मार्गाचा वापर करावा.

**२) सावरकर पुतळा चौक ते समाधान भेळ सेंटर (सिंहगड रोड)**
गणपती विक्री दरम्यान रस्त्याचे दोन्ही बाजूकडील वाहतूक सुरु राहील, परंतू नमुद टप्प्यामध्ये कोणत्याही प्रकारची वाहने पार्क करु नये.

❖ आवश्यकतेप्रमाणे बॅरिकेडस् व दोरचा वापर करण्यात येईल.

पार्किंग व्यवस्था :-

१. मित्रमंडळ चौक ते पाटील प्लाझा पर्यत.
२. जमनालाल बजाज पुतळा ते पुरम चौक रस्त्याचे डाव्या बाजूस
३. निलायम ब्रिज ते सिंहगड रोड जंक्शन

ब) वाहतूक सुरु असलेले रस्ते :-

खालील नमुद मार्गावरुन सर्व प्रकारच्या वाहनांकरीता (जड वाहनांना प्रवेश बंदी) एकेरी वाहतूक सुरु राहील.

१. फडके हौद चौक ते जिजामाता चौक ते फुटका बुरुज
२. आप्पा बळवंत चौक ते बुधवार चौक ते मोती चौक
३. सोन्या मारुती चौक ते बेलबाग चौक ते सेवासदन चौक
४. मंगला टॉकिज समोरील प्रिमीयर गॅरेज लेन मधून कुंभारवेस

**क) पार्किंग व्यवस्था :-**

गणेश मुर्ती खरेदीसाठी येणारे भक्त/मंडळाची वाहने पार्किगसाठी खालील प्रमाणे व्यवस्था करण्यात येत आहे.

१. न्या.रानडे पथावर कामगार पुतळा चौक ते शिवाजी पुतळा या दरम्यान रस्त्याचे कोर्टाकडील एका बाजूस.
२. वीर संताजी घोरपडे पथावर म.न.पा. बिलभरणा केंद्र ते गाडगीळ पुतळा चौक या रस्त्याचे दक्षिण बाजूस
३. टिळक पुल ते भिडे पुल दरम्यानचे नदीपात्रातील रस्त्यावर
४. मंडई येथील मिनर्व्हा व आर्यन पार्किंग तळावर
५. शाहू चौक (फडगेट चौकी चौक) ते राष्ट्रभुषण चौक :- फक्त रस्त्याचे डावे बाजुस

**ड ) पी.एम.पी.एम.एल. बसेसच्या डायव्हर्शनबाबत :-**

१. शिवाजीनगर स्टॅण्डवरुन शिवाजीरोडने स्वारगेटकडे जाणाऱ्या बसेस हया स.गो.बर्वे चौकातून शिवाजीपुलावरुन जाण्याऐवजी स.गो.बर्वे चौकामधून जंगली महाराज रोडने टिळक चौक मार्गे टिळक रोडने स्वारगेटकडे जातील.
२. कार्पोरेशन बसस्टॉप येथून स्वारगेटकडे जाणाऱ्या बसेस ह्या झाशीराणी चौक मार्गे जंगली महाराज रोडने अलका टॉकीज चौक, टिळक रोड / शास्त्री रोडने स्वारगेटकडे जातील.

तरी वाहनचालकांनी वरील प्रमाणे करण्यात आलेल्या वाहतुक बदलांचा अवलंब करून वाहतुक सुरळीत ठेवण्यास वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे असे आवाहन वाहतूक शाखेमार्फत करण्यात येत आहे.

16/9/2023

( विजयकुमार मगर )
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

**प्रत** :- १.जिल्हा प्रसिध्दी अधिकारी पुणे-१,स्थानिक वृत्तपत्रात बातमी स्वरुपात प्रसिध्दी देणेकामी
२.सहाय्यक पोलीस आयुक्त,परिमंडळ-१,२,३ वाहतुक शाखा पुणे शहर
३.सर्व प्रभारी अधिकारी, वाहतुक शाखा पुणे शहर

प्रत
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा-१ पुणे शहर